| वर्ष - 8 | अंक - 71 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 17 सप्टेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

गणपती बाप्पा मोरया

पुढच्या वर्षी लवकर या...!

**जाहीर निवेदन**

आज दिनांक 17 सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी असल्यामुळे महाईन्यूजच्या कार्यालयास सुटी असल्यामुळे उद्या बुधवार दिनांक 18 सप्टेंबर रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची आमचे वाचक, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी. -संपादक

## पुण्यातून अजित पवारांचं गणेशभक्तांना आवाहन

# उत्साहाचा उन्माद नको!

### “जर 36 तास मिरवणूक चालली तर... पोलिसांवरही अतिरिक्त ताण निर्माण होतो

। पुणे । महाईन्यूज

**मला दगडूशेठ हलवाई मंडळातल्या सहकाऱ्यांनी सांगितलं की त्यांचं विसर्जन साधारण संध्याकाळी ४ वाजता करण्याचं नियोजन केलं आहे. तसं झालं आणि सर्व गणेश मूर्तींचं त्या त्या दिवशीच विसर्जन झालं तर पोलीस, नागरिकांच्या दृष्टीनं ते बरं होतं. नाहीतर ३६ तास मिरवणूक चालली तर पोलिसांवरही अतिरिक्त ताण निर्माण होतो. सगळ्यांनी अशा उत्सवाच्या वेळी आपली कर्तव्य, बंधनांचं पालन करावं. कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी राज्य सरकार व पोलीस यंत्रणेवर असते. पण नागरिकांनीही त्यांच्यावरची बंधनं पाळावीत, असे आवाहन पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी गणेश मंडळांना केले आहे.**



गेल्या १० दिवसांपासून अवघ्या महाराष्ट्राचं वातावरण भक्तिमय करून टाकणाऱ्या गणेशोत्सवाचा आज शेवटचा दिवस असून लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी गणेशभक्तांनी जय्यत तयारी केली आहे. मुंबई-पुण्यासह राज्यभरात बाप्पांच्या मिरवणुकीसाठी ठिकठिकाणी आयोजन करण्यात आलं आहे. पोलीस यंत्रणा यादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सज्ज आहे. त्याव्यतिरिक्त मिरवणूक जाणाऱ्या मार्गांवरील वाहतूकही तात्पुरती इतर मार्गांवर वळवण्यात आली आहे.

धोकादायक पुलावरून गणेश विसर्जन मिरवणूक निघताना जुन्या तशाच धोकादायक पुलावरून १०० पेक्षा अधिक व्यक्ती विसर्जन मिरवणूकी वेळी जाणार नाहीत. विसर्जन मिरवणूक जुन्या तसेच धोकादायक पुलावर थांबणार नाहीत, याची काळजी घेण्याबाबतच्या सूचना गणेश मंडळांना देण्यात आल्या आहेत. मुंबईतील घाटकोपर रेल ओव्हर पूल, करीरोड रेल ओव्हर पूल, चिंचपोकळी रेल ओव्हर पूल, भायखळा रेल ओव्हर पूल, मरिन लाईन्स रेल ओव्हर पूल, सँडहर्स्ट रोड रेल ओव्हर पूल, फ्रेंच रेल ओव्हर पूल, केनडी रेल ओव्हर पूल, फॉकलन्ड रेल ओव्हर पूल, महालक्ष्मी स्टील रेल ओव्हर पूल, प्रभादेवी- कॅरोल रेल ओव्हर पूल, दादर टिळक रेल ओव्हर पूल आदी पुलांचा यात समावेश आहे. छेडछाड रोखण्यासाठी गर्दीच्या ठिकाणीध्या वेशातील पोलिस असणार आहेत. त्याच बरोबर शहरात बसवण्यात आलेल्या सीसीटिव्ही कॅमेऱ्याच्या मदतीने गर्दीच्या ठिकाणी लक्ष ठेवले जाणार याशिवाय राज्य राखीव पोलीस दलाच्या १० कंपनी, १५ अतिरिक्त प्लाटून, एक हजार गृहरक्षक दलाचे जवान तैनात करण्यात येणार आहेत. गणपती विसर्जनासाठी लालबागचा राजाच्या मार्गिकेवर पाच हजार पोलीस तैनात करण्यात येणार आहेत. १७ सप्टेंबर व १८ सप्टेंबर या दोन दिवशी शहरात ९ अतिरिक्त पोलीस आयुक्त, ४० उपायुक्त, ५६ सहाय्यक पोलीस आयुक्त,

### कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये...

गणपती विसर्जन व ईद दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये, यासाठी सुमारे २० हजार पोलीस तैनात करण्यात येणार असल्याची माहिती सहपोलीस आयुक्त(कायदा व सुव्यवस्था) सत्यनारायण चौधरी यांनी सांगितले. अनंत चतुर्दशीला शहरातील कायदा आणि सूव्यवस्था राखण्यासाठी २० हजारांहून अधिक पोलीस बंदोबस्तासाठी तैनात करण्यात येणार आहेत. याशिवाय वाहतूक विभागाचे अडीच हजार अधिकारी आणि कर्मचारी वाहतुकीचे नियोजन करणार आहेत. लालबाग गणेश मंडळाच्या सुरक्षेसाठी पाच हजार पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

## माजी खासदार हेमंत पाटलांचे राजकीय पुनर्वसन

### शिंदे सरकारने दिला मंत्रीपदाचा दर्जा, लोकसभा निवडणुकीत कापलं होतं तिकीट

। हिंगोली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

हिंगोली लोकसभेचे माजी खासदार हेमंत पाटील यांची लोकसभा निवडणुकीत उमेदवारी डावलली गेली होती आणि त्याऐवजी त्यांची पत्नी राजश्री पाटील यांना वाशिम-यवतमाळ लोकसभेची उमेदवारी दिली होती. ऐनवेळी उमेदवारी दिल्याने त्या ठिकाणी पराभव स्वीकारावा लागला.



यात वाशिम यवतमाळच्या माजी खासदार भावनाताई गवळी यांना डावलून राजश्रीताई पाटील यांना ही उमेदवारी दिली गेली होती. कुठे नाराज असलेल्या भावना गवळी यांचं देखील सरकारने पुनर्वसन करून विधान परिषदेची आमदारकी त्यांना देण्यात आली. मात्र माजी खासदार हेमंत पाटील यांचं राजकीय पुनर्वसन करण्यासाठी सरकारला विलंब झाला होता. आता विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर हेमंत पाटील यांचं राजकीय पुनर्वसन करण्याच्या हालचाली महायुती सरकारकडून केल्या गेल्या. वसमत मधील बाळासाहेब ठाकरे हळद हरिद्रा संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष असलेले माजी खासदार हेमंत पाटील हे अध्यक्षपदावर असेपर्यंत त्यांना मंत्रीपदाचा दर्जा देण्यात आला आहे. यावर राज्याच्या कृषी व पशुसंवर्धन विभागाने निर्णय जाहीर केला.

### विधानसभेसाठी बळ देण्याचा प्रयत्न

हिंगोली लोकसभेची उमेदवारी हेमंत पाटील यांना जाहीर केल्यानंतरही शिंदेंच्या शिवसेनेकडून मागे घेण्यात आली होती. भाजपच्या सर्व्हेचे कारण देत त्यांची उमेदवारी मागे घेण्यात आली होती. पण त्यांच्या पत्नी राजश्री पाटील यांना शेजारच्या यवतमाळ वाशिम लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली होती. यामध्ये दोन्ही जागा या शिंदे गटाने गमावल्या. हेमंत पाटलांची उमेदवारी मागे घेतल्यानंतर ते नाराज होते अशी चर्चा होती. आता एकनाथ शिंदे यांनी हेमंत पाटील यांना मंत्रिपदाचा दर्जा देऊन त्यांची नाराजी दूर केल्याचे बोलले जाते.

# कोल्हापूर ते पुणे वंदे भारत ट्रेन सुरु

## मोदींनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे वंदे भारतला हिरवा झेंडा दाखवला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोल्हापूर ते पुणे या दरम्यान वंदे भारत ट्रेन सुरु झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे या ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. पत्रकार आणि काही कोल्हापूकरांनी या ट्रेनने प्रवास केला. आता कोल्हापूर ते मुंबई अशीच ट्रेन सुरु करा अशी अपेक्षा काही कोल्हापूरकरांनी व्यक्त केली आहे. तसंच आज पुणे ते हुबळी या वंदे भारतट्रेन सुरु करण्यात आली. या कार्यक्रमाला अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती होती.**



वंदे भारत एक्स्प्रेस सोमवार, गुरुवार आणि शनिवार या तीन दिवशी सकाळी ८ वाजून १५ मिनिटांनी सुटेल, दुपारी १ वाजून ३० मिनिटांनी पुणे स्थानकांवर पोहचेल.प्रत्येक बुधवार, शुक्रवार, रविवार या दिवशी दुपारी २ वाजून १५ मिनिटांनी वंदे भारत ( Vande Bharat ) ट्रेन सुटेल जी संध्याकाळी ७.४० ला कोल्हापुरात पोहचेल.वंदे भारत ट्रेनला ( Vande Bharat ) मिरज, सांगली, किर्लोस्करवाडी, कराड, सातारा या स्थानकांवर थांबा देण्यात आला आहे. एकूण ८ डब्यांची वंदे भारत ट्रेन, त्यात सात चेअर कार डबे, एक एक्झिक्युटिव्ह क्लास डबा पाच डब्यात ७८ आसन क्षमता आहे, तर रेल्वे इंजिन जवळच्या दोन डब्यांमध्ये ४४ आसन क्षमता एकूण आसन क्षमता ५३० प्रवासी तिकिट दर प्रतिव्यक्ती ५६० रुपये, एक्झिक्युटिव्ह क्लाससाठी ११३५ रुपये तिकिट दरांमध्ये चहा, जेवण आणि पाणी मिळणारवंदे भारत ट्रेन ( Vande Bharat ) आता कोल्हापूर ते पुणे या शहरांमध्ये धावणार आहे. तरी लवकरच मुंबईपर्यंत सुरु केली जावी अशी कोल्हापूरकरांची अपेक्षा आहे.कोल्हापूर पुणे वंदे भारत ( Vande Bharat ) सकाळी सव्वाआठच्या सुमारास कोल्हापूरातून निघेल त्यानंतर मिरजमध्ये ९ वाजता, सांगलीत सव्वा नऊ वाजता, किर्लोस्करवाडीत ९.४२, कराड १०.०७, सातारा १०.४७ आणि पुण्यात दीड वाजता पोहोचणार आहे. पुण्यातून परतणारी गाडी दुपारी सव्वा दोन वाजता सुटेल. साताऱ्यात ४.३७ कराड ५.२५, किर्लोस्करवाडीत ५.५०, सांगली ६.१८ , मिरजेत ६.४० तर कोल्हापुरात ७.४० ला पोहोचणार आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदींनी महाराष्ट्राला तीन वंदे भारत ( Vande Bharat ) ट्रेनची भेट दिली आहे. विशेषतः पुणे कोल्हापूर, पुणे हुबळी आणि नागपूर सिकंदराबाद अशा तीन ट्रेनमुळे महाराष्ट्रातले प्रवासी आहेत त्यांचा प्रवास गतिमान आणि सुखकर होणार आहे. वंदे भारत ट्रेन भारताची शान आहे. भारताने आपल्या देशात आंतरराष्ट्रीय ट्रेन तयार केली आहे. जगातल्या ट्रेन्समध्ये जशा सुविधा प्रवाशांना मिळतात तशा प्रकारच्या सुविधा या वंदे भारत ट्रेनमध्ये भारतीयांना मिळत आहेत. त्यामुळेच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे मी आभार मानतो. कोल्हापूर ते पुणे या दरम्यान वंदे भारत ट्रेन सुरु झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे या ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. पत्रकार आणि काही कोल्हापूकरांनी या ट्रेनने प्रवास केला. आता कोल्हापूर ते मुंबई अशीच ट्रेन सुरु करा अशी अपेक्षा काही कोल्हापूरकरांनी व्यक्त केली.

### देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

आहे. तसंच आज पुणे ते हुबळी या वंदे भारतट्रेन सुरु करण्यात आली. या कार्यक्रमाला अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती होती.पंतप्रधान नरेंद्र मोदींनी महाराष्ट्राला तीन वंदे भारतट्रेनची भेट दिली आहे. विशेषतः पुणे कोल्हापूर, पुणे हुबळी आणि नागपूर सिकंदराबाद अशा तीन ट्रेनमुळे महाराष्ट्रातले प्रवासी आहेत त्यांचा प्रवास गतिमान आणि सुखकर होणार आहे. वंदे भारत ट्रेन भारताची शान आहे. भारताने आपल्या देशात आंतरराष्ट्रीय ट्रेन तयार केली आहे. जगातल्या ट्रेन्समध्ये जशा सुविधा प्रवाशांना मिळतात तशा प्रकारच्या सुविधा या वंदे भारत ट्रेनमध्ये भारतीयांना मिळत आहेत.

# माणूसपणाचा परीघ रुंदावत राहणे गरजेचे

## ज्येष्ठ कवी-गज़लकार रमण रणदिवे यांची भावना

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘कविता म्हणजे मनाचं पाझरणं असतं. त्याला वास्तवाचा स्पर्श झाला की कवीला अनुभवाचा तळ दिसू लागतो. सभोवतालच्या जगामध्ये अस्वस्थ करून टाकणाऱ्या बातम्या सातत्याने आपल्यासमोर येत आहेत.**

अशा वेळी माणूसपणाचा परीघ रुंदावत राहण्यासाठी कार्यरत राहणे हे कवीचे कर्तव्य आहे,’ अशी भावना ज्येष्ठ कवी-गज़लकार रमण रणदिवे यांनी व्यक्त केली. गज़ल हा एक काव्यप्रकार आहे. त्यामुळे गज़लकाराने स्वत:ला इतरांपेक्षा मोठे किंवा श्रेष्ठ समजू नये, याकडे त्यांनी लक्ष वेधले.ज्येष्ठ कवी-गज़लकार रमण रणदिवे यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त शनिवारी (२१ सप्टेंबर) त्यांचा माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते सत्कार होणार आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात सायंकाळी साडेपाच वाजता होणाऱ्या कार्यक्रमास ज्येष्ठ संगीतकार-गायक पं. हृदयनाथ मंगेशकर आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास पवार उपस्थित राहणार आहेत. रमण रणदिवे मित्र परिवारातर्फे



आयोजित कार्यक्रमाच्या उत्तरार्धात ‘ऋतू फुलांचा’ या गज़ल मुशायऱ्यामध्ये म. भा. चव्हाण, राजेंद्र शहा, ज्योत्स्ना चांदगुडे, ममता सपकाळ, प्रमोद खराडे, वैभव देशमुख, सुनीती लिमये, प्रा. उद्धव महाजन सहभागी होणार आहेत.‘फुलं का फुलतात?’ तर, ‘माणसं अधिक निर्दयी होऊ नयेत म्हणून’, असे मी एका कवितेमध्ये म्हटले आहे. या तरल संवेदनाच माणसाचे माणूसपण टिकवून ठेवणार आहेत, असे सांगून रणदिवे म्हणाले, ‘माझ्यामध्ये कवितेचे बीज वडिलांनी रुजविले. मी संवादिनीवादक होतो. आवाजही चांगला होता. म्हणून वडिलांनी मला पं. यशवंतबुवा मराठे यांच्याकडे गाणे शिकायला पाठविले. जीवनाचा अनुभव कवितेतून मांडताना कवी समाजातील विसंवादालाच शब्दरूप देत असतो.

### वेगळी मेहनत करावी लागत नाही

गाणं शिकतानाच मी गुलाम अली, मेहंदी हसन यांच्या गज़ल ऐकत होतो. त्यांचे गायन आणि शब्दोच्चारण यातून मला गज़लची गोडी लागली. त्याच सुमारास सुरेश भट यांचा ‘रंग माझा वेगळा’ संग्रह वाचनात आला, अशी गज़ल लिहिता आली पाहिजे या ध्येयाने मी भट यांच्यासह डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी, डॉ. राम पंडित यांचे मार्गदर्शन घेतले. त्यावेळी ‘लोकप्रभा’मध्ये माझ्या गज़ल प्रसिद्ध होत असत. त्या सुरेश भट यांनी वाचल्या होत्या. पुढे माझा पत्ता मिळवून ते मला घरी भेटायला आले होते. जणू परमेश्वरच घरी आल्याची भावना झाली होती. अनुभव सच्चा असेल तर वाचकांच्या गळी उतरविण्यासाठी त्याला वेगळी मेहनत करावी लागत नाही.

### अनंत चतुर्दशीच्या आदल्या दिवशी श्री गणेशाचे विसर्जन करण्याची भोसरीतील सार्वजनिक मंडळांची परंपरा

# भोसरीत गणरायाला भावपूर्ण निरोप!

## गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोष, उत्साहपूर्ण वातावरण

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष, भंडाऱ्याची मुक्त उधळण आणि ढोल-ताशांच्या गजरात भोसरीत सोमवारी (दि. 16) घरगुती तसेच सार्वजनिक गणेशाचे विसर्जन करण्यात आले. प्रमुख मंडळांनी आकर्षक रथांमध्ये मिरवणुका काढल्या. अनेक मंडळांनी भंडाऱ्याची मुक्त उधळण केली. अनंत चतुर्दशीच्या आदल्या दिवशी श्री गणेशाचे विसर्जन करण्याची भोसरीतील सार्वजनिक मंडळांची परंपरा आहे. त्यानुसार सोमवारी विसर्जन मिरवणुकांना गावठाणातील बापूजीबुवा चौकातून प्रारंभ झाला. कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृहासमोरील मैदानात गणेशमूर्ती विसर्जनासाठी महापालिकेने तीन हौद बांधले होते. या ठिकाणी तसेच मोशी येथे इंद्रायणी नदीघाटावर अग्निशामक दलाचे कर्मचारी, जीवरक्षक तैनात होते. महापालिकेच्या वतीने तसेच, पिंपरी चिंचवड पोलीस नियंत्रण कक्ष आणि पिंपरी चिंचवड शहर काँग्रेसच्या वतीनेही पीएमटी चौकात स्वागतकक्ष उभारण्यात आला होता. मंडळांच्या अध्यक्षांचा पुष्पगुच्छ आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.**



सर्वात प्रथम साडेचार वाजता संत ज्ञानेश्वर भाजी मंडई सार्वजनिक गणेश मंडळाचे आगमन झाले. ढोल ताशा पथक भंडाऱ्याची मुक्त उधळण करीत या मंडळांनी आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला. मंडळाचे अध्यक्ष बोराटे यांचे स्वागत महापालिकेच्या कक्षामध्ये करण्यात आले. यावेळी उपायुक्त राजेश आगळे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहीवाल, प्रशासनाधिकारी नाना मोरे, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक उपस्थित होते. त्यानंतर कानिफनाथ मित्रमंडळाचे आगमन झाले. मंडळाचे अध्यक्ष मयूर पाचारणे यांचेही स्वागत पालिकेच्या कक्षामध्ये करण्यात आले. साडेपाच नंतर खऱ्या अर्थाने सार्वजनिक गणेश मंडळाच्या आगमनाला सुरुवात झाली. फुलांनी सजवलेले रथ, आकर्षक विद्युत रोषणाई, पारंपारिक वाद्यांचा ठेका अशा वातावरणात सार्वजनिक गणेश मंडळांनी आपल्या लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला.

भोसरीतील मानाचा गणपती अशी ओळख असलेल्या लांडगे लिंबाची तालीम मित्र मंडळाचे गणराय 'त्रिशूळ' रथामध्ये विराजमान झाले होते. रथासमोर अभेद्य पथकाने पारंपारिक वाद्यांच्या दणदणाटात सलामी दिली. लोंढे तालीम मित्र मंडळाने यंदा अयोध्यापती रथ साकारला होता. श्रीरामाची देखणी मूर्ती भाविकांचे लक्ष वेधून घेत होती. नाथसाहेब प्रतिष्ठानने श्रीराम रथ बाप्पांच्या विसर्जनाच्या मिरवणुकीसाठी तयार केला होता.

माळी आळी मित्र मंडळांच्या मिरवणुकीत भोसरीतील वीर वाद्य पथक सहभागी झाले होते. सायंकाळी सात वाजेपर्यंत 33 मंडळांनी बाप्पांना निरोप दिला. फुगे माने तालीम मंडळाचे बाप्पा सरदार आणि निनाद या ढोल ताशा पथकांची सलामी घेत विसर्जनासाठी रवाना झाले. या मंडळाने आकर्षक विद्युत रोषनाई केलेल्या रथात गणरायाला विराजमान केले होते.

नव महाराष्ट्र तरुण मंडळाचा बाप्पा आकर्षक फुलांनी सजवलेला मयूर रथात विराजमान झालेला होता. या मंडळाच्या बाप्पांसमोर आय्याप्पा मंदिर वाजंत्रीचे वादन लक्षवेधक ठरले. तसेच विघ्नहर्ता ढोल ताशा पथक व मंगल बँडने वातावरणात वेगळाच रंग भरला. श्री गणेश मित्र मंडळाचे बाप्पा चिखलीतील मल्हार वाद्य पथकाच्या ढोल ताशाच्या तालावर वाजत गाजत आले. मंडळाचे गणराज आकर्षक विद्युत रोषणाई केलेल्या मंदिरात आरूढ झाले होते. श्रीकृष्ण तरुण मंडळाने आकर्षक फुलांनी सजविलेल्या रथातून गणपतीची विसर्जन मिरवणूक काढली. नरवीर तानाजी तरुण मंडळाच्या डिजेच्या तालावर तरुणाईने ठेका धरला आणि त्याच जल्लोषात बाप्पाचे विसर्जन झाले. मंडळाने विसर्जन मिरवणुकीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज विजयरथ हा देखावा साकारला होता. समस्त गव्हाणे तालीम मंडळाचे बाप्पा सुवर्णरथात आरुढ झाले होते. अष्टविनायक मित्र मंडळ व आदर्श मित्र मंडळाचे बाप्पा राम रथात विराजमान झाले होते. दामू शेठ गव्हाणे मित्र मंडळाने आकर्षक विद्युत रोषणाई केलेल्या रथात बाप्पा आरुढ झाले होते. रात्री उशिरापर्यंत विसर्जन मिरवणुका सुरू होत्या. पठारे लांडगे तालीम मंडळ आणि श्रीराम मित्र मंडळ यांनी यंदा एकत्रित मिरवणूक काढली.



### मर्दानी खेळ सादर

छत्रपती शिवाजी तरुण मंडळाने बाप्पांना गजराच्या मिरवणुकीतून भावपूर्ण निरोप दिला. या मंडळाच्या बाप्पांसमोर मावळातील पथकाने मर्दानी खेळ सादर केले. या खेळांनी भाविकांचे अक्षरशः डोळ्यांचे पारणे फिटले. पीएमटी चौकात भोसरी पोलीस स्टेशन तर्फे मिरवणुकांवर लक्ष ठेवण्यासाठी उंच मनोरा उभारण्यात आला होता. पीएमटी चौकात महापालिकेतर्फे, पोलीस नियंत्रण कक्षातर्फे आणि काँग्रेस तर्फे स्वागत कक्ष उभारण्यात आले होते. मंडळाच्या कार्यकर्त्यांचे स्वागत शहराध्यक्ष कैलास कदम, ओबीसी सेल अध्यक्ष सोमनाथ शेळके, दक्षिण भारतीय सेलचे अध्यक्ष जॉर्ज मॅथ्यू, ब्लॉक अध्यक्ष विठ्ठल शिंदे जय राऊत, शहाजी पाटील यांनी केले.

# शहरात आज 11 दंगल नियंत्रण पथके

## 2400 अंमलदार यासह भलामोठा फौजफाटा तैनात

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**गणेश विसर्जन मिरवणुकांसाठी पिंपरी चिंचवड पोलिसांकडून सुमारे 4000 पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. विसर्जन मिरवणुकांसाठी पोलिसांनी चोख नियोजन केले आहे. शहरात आज 11 दंगल नियंत्रण पथके, 2400 अंमलदार आणि भलामोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.**



तळेगाव दाभाडे, तळेगाव एमआयडीसी, शिरगाव, सांगवी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गणेश मंडळाचे विसर्जन सातव्या दिवशी झाले. त्यासह शहराच्या विविध भागातील गणेश मंडळांचे सातव्या दिवशी विसर्जन झाले. सर्वाधिक विसर्जन मिरवणुका अनंत चतुर्दशीच्या दिवशी काढल्या जातात. आज (मंगळवारी, दि. 17) या विसर्जन मिरवणुका काढल्या जाणार आहेत.

पिंपरी मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते शगुन चौक मार्गे झुलेलाल घाटाकडे सर्वाधिक मिरवणुका निघतात. चिंचवड मध्ये चापेकर चौक मार्गे थेरगाव घाट या मार्गावर विसर्जन मिरवणुका काढल्या जातात. तसेच इतर भागातही मिरवणुकीचे नियोजन केले जाते. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत दोन हजार 14 सार्वजनिक गणेश मंडळांनी गणरायाची प्रतिष्ठापना केली. यातील काही मंडळांचे विसर्जन झाले आहे. उर्वरित सर्व मंडळे मंगळवारी विसर्जन करणार आहेत. लाडक्या बाप्पाला निरोप देताना कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनी चोख नियोजन केले आहे. ठीक ठिकाणी बंदोबस्त तैनात केला जाणार आहे.

### असा आहे बंदोबस्त

| | |
|---|---|
| पोलीस निरीक्षक | – 53 |
| सहायक निरीक्षक/उपनिरीक्षक | – 245 |
| अंमलदार | – 2400 |
| होमगार्ड | – 500 |
| दंगा काबू पथक | – 11 |
| एसआरपीएफ कंपनी | – 1 |
| बॉम्ब शोधक नाशक पथक | – 1 |

# केजरीवालांची अचूक वेळी सुटका!



भूमिका

**आम आदमी पक्षाचे (आप) सर्वेसर्वा आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल ऐन मोक्याच्या वेळी तुरुंगातून बाहेर आले आहेत. हरियाणामधील विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असताना केजरीवाल यांची सुटका झाली असल्यामुळे 'आप'च्या कार्यकर्त्यांचा उत्साह दुणावला आहे. '**

'आप' म्हणजे केजरीवाल हेच समीकरण गेल्या काही वर्षांत रूढ झालेले आहे. त्यामुळे केजरीवाल नसतील तर 'आप' निवडणूक तरी कशी लढवणार असे बोलले जात होते. लोकसभा निवडणुकीवेळीही केजरीवाल तुरुंगात होते, त्यांना हंगामी जामीन मिळाला हा भाग वेगळा. पण ते दिल्लीतील प्रचारासाठी उपलब्ध झाले नसते तर 'आप'साठी प्रचार कोणी केला असता असा प्रश्न तेव्हाही विचारला गेला होता. त्या वेळी सर्वोच्च न्यायालयाने केजरीवालांना हंगामी जामीन दिला, त्यांनी धूमधडाक्यात प्रचारही केला. 'आप' व काँग्रेस यांच्या आघाडीला तेव्हा दिल्लीत यश मिळाले नाही. पण केजरीवालांच्या झंझावाती प्रचारामुळे त्यांचे पक्षातील आणि 'इंडिया' आघाडीतील महत्त्व वाढले असे म्हणता येईल.मद्याविक्री घोटाळा प्रकरणात केजरीवालांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन दिला आहे. दिल्ली आणि पंजाबनंतर 'आप'ने आता हरियाणावर लक्ष केंद्रित केले आहे. हरियाणा हे



तर केजरीवाल यांचे मूळ राज्य आहे. स्वत:च्या राज्यामध्ये पक्षाला भक्कम करण्याची संधी केजरीवाल पाहात होते. विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने ही संधी चालून आली आहे, असे 'आप'ला वाटते. हरियाणामध्ये ५ ऑक्टोबर रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार असून ९० जागांवर 'आप'ने स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेतला आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये 'आप' व काँग्रेसने आघाडी केली होती. हरियाणातील १० पैकी ९ जागा काँग्रेसने तर कुरुक्षेत्रची १ जागा 'आप'ने लढवली होती. काँग्रेसने ५ जागा जिंकून राज्यातील सत्ताधारी भाजपला हादरा दिला. त्यामुळेच खरेतर विधानसभा निवडणुकीतही 'आप' व काँग्रेस एकत्र लढतील असे मानले जात होते. 'इंडिया' आघाडी एकत्र लढली तर भाजपचा पराभव करता येतो हे काही प्रमाणात का होईना लोकसभा निवडणुकीत दिसून आले होते. हरियाणामध्ये तर काँग्रेसने निम्म्या जागा जिंकल्या होत्या. 'आप' व काँग्रेस एकत्र लढले तर भाजपचा पराभव निश्चित मानला जात होता. पण या राज्यातील काँग्रेसच्या भूपेंद्रसिंह हुड्डा यांच्यासारख्या बड्या नेत्यांनी 'आप'शी आघाडी करण्याला तीव्र नकार दिला. वास्तविक राहुल गांधी व इतर केंद्रीय नेत्यांनी आघाडी करण्याची भूमिका घेतली होती; पण प्रदेश काँग्रेस नेत्यांच्या विरोधामुळे 'आप'शी आघाडी होऊ शकली नाही. त्यामुळे दोन्ही विरोधी पक्ष भाजपविरोधात वेगवेगळे लढतील. त्याचा सर्वाधिक फटका कोणाला बसणार, हा कळीचा प्रश्न आहे.लोकसभा निवडणुकीमध्ये दिल्लीत 'आप'शी आघाडी करून काँग्रेसला काहीच फायदा झाला नाही असे काँग्रेसच्या नेत्यांचे म्हणणे आहे. हरियाणामध्ये 'आप'ला सोबत न घेताही भाजपचा पराभव करता येईल, इतके अनुकूल वातावरण असल्याचाही दावा काँग्रेसच्या नेत्यांनी केला आहे. काँग्रेसच्या नेत्यांच्या म्हणण्यानुसार, 'आप'चे निमशहरी वा ग्रामीण भागांमध्ये फारसे अस्तित्व नाही. हरियाणामध्ये 'आप' अद्याप खोलवर रुजलेली नाही. 'आप'शी आघाडी केली तर काँग्रेसच्या जनाधाराचा पाठिंबा मिळवून 'आप' पक्षाचा विस्तार करेल. काँग्रेसचा वापर करून हरियाणामध्ये 'आप' वाढेल. ही संधी 'आप'ला कशासाठी मिळवून द्यायची असा रास्त प्रश्न काँग्रेसच्या हरियाणवी नेत्यांनी केंद्रीय नेतृत्वाकडे केला. दिल्ली आणि पंजाबमध्ये 'आप'ची सत्ता असून हरियाणामध्येही 'आप'ने पाय पसरले तर नुकसान काँग्रेसचेच होईल असे मानले जाते.पण 'आप' व काँग्रेस एकत्र लढले तर मतांचे विभाजन टळेल आणि भाजपचा एकतर्फी पराभव करता येऊ शकेल असे गणित मांडले जात आहे. 'आप' व काँग्रेस वेगवेगळे लढणे भाजपच्या पथ्यावर पडू शकते. म्हणूनच केजरीवाल अचूकवेळी तुरुंगातून बाहेर आले असे म्हणता येईल. केजरीवाल वातावरणामध्ये जोश निर्माण करू शकतात. आता त्यांच्या हरियाणातील प्रचारसभा दणक्यात होऊ शकतील. 'आप'ने हरियाणामध्ये 'पूर्ण बदला'ची घोषणा केली आहे.

प्रासंगिक »

## 'माहेर'चे मस्तवाल!

***ज्या कारणासाठी डॉ. रानडे आता अपात्र ठरतात ते कारण त्यांची निवड झाली तेव्हाही होते. पण त्या वेळी ते खुपले नाही, यातून सरकारी निर्लज्जपणा उघड होतो...***

विनोद या कलाप्रकारामुळे हसू उमटणे आणि हसे होणे यात मूलत: फरक आहे. आपले प्रशासन, शिक्षण व्यवस्था इतके दिवस विनोदाचा विषय होते. आता ते टिंगलीचा आणि प्रहसनाचा विषय होऊ लागले आहेत. एका बाजूने सरकार खासगी क्षेत्रातील कार्यक्षमांस सरकारी सेवेत घेऊ पाहते, नवे शैक्षणिक धोरण खासगी क्षेत्रातील अभ्यासकांस प्राध्यापकीसाठी निवडण्याचा प्रस्ताव देते आणि त्याच वेळी पुण्यातील गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या कुलगुरूपदावरून या कारणामागील प्रहसन असे की जेव्हा विख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांस सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूपदी नेमले गेले तेव्हा त्यांस हा अध्यापनाचा असा अनुभव होता काय? अलीकडे विद्यामान सरकारनेच डॉ. प्रशांत बोकारे यांना गोंडवाना विद्यापीठाच्या कुलगुरूपदी नेमले तेव्हा या अटीची पूर्तता होत होती काय?

परराष्ट्रमंत्री सुब्रह्मण्यम जयशंकर यांनी नुकतेच भारत-चीन प्रत्यक्ष ताबा रेषेवरील स्थितीविषयी विधान करताना, '७५ टक्के सैन्यमाघारी समस्या संपुष्टात आल्या'चे म्हटले आहे. जयशंकर यांच्याव्यतिरिक्त गेल्या काही दिवसांत या विषयावर आणखीही वक्तव्ये आली आहेत.

## उर्वरित 25 टक्के सैन्यमाघारी कधी?

पण जयशंकर यांचे वक्तव्य अधिक लक्षवेधी, कारण ते परराष्ट्रमंत्री आहेत. म्हणजे सरकारातील उच्चपदस्थ आहेत. शिवाय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्याप्रमाणे भावनिक बेटकुळ्यायुक्त वक्तव्ये करण्याचे टाळतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, समस्येचे निराकरण अमुक टक्के झाले आहे असे त्यांच्या स्वभावाशी आणि परराष्ट्र व्यवहार संकेतांशी काहीसे विपरीत वक्तव्य त्यांनी केले आहे. त्यामुळे त्याची दखल घेणे भाग पडते. ते घेण्यापूर्वी आणखी काही घडामोडींची नोंद घ्यावी लागेल. जयशंकर जीनिव्हात जे बोलले, त्यानंतर काही तासांतच रशियातील सेंट पीटर्सबर्ग येथे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि चीनचे परराष्ट्रमंत्री वँग यी यांच्यात चर्चा झाली. पूर्ण सैन्यमाघारीच्या दिशेने चर्चा आणि वाटाघाटी अधिक तातडीने करण्याबद्दल कटिबद्धता दोन्ही बाजूंनी व्यक्त केली. त्यानंतर काही तासांनी म्हणजे रविवारी चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने निवेदन प्रसृत केले. त्यात



पूर्व लडाख सीमेवर गलवानसह चार भागांतून सैन्यमाघारी पूर्ण झाल्याचे म्हटले आहे. इतर तीन ठिकाणांचा थेट उल्लेख नाही. गेल्या चार दिवसांतील या सर्व घडामोडी आहेत.भारत आणि चीन पूर्व लडाख सीमेवरील सर्व वादांवर यशस्वी तोडगा काढण्याच्या समीप पोहोचले आहेत, असा याचा अर्थ काढता येऊ शकेल. परंतु एखाद्या समस्येचे पूर्ण निराकरण आणि त्या टप्प्याच्या समीप पोहोचणे यात फरक असतो. विशेषत: अशा समीकरणात चीनसारखा ताकदवान, बेभरवशाचा आणि वर्चस्वाकांक्षी देश असेल तर या घडामोडींकडे भिंग लावूनच पाहावे लागते.गलवान आणि पूर्व लडाख टापूतील भारत-चीन प्रत्यक्ष ताबारेषेवर सशस्त्र चकमक, त्यातून मनुष्यहानी झाल्याच्या लडाखमधील घटनेला दोन वर्षे, तर गलवानमधील घटनेला चार वर्षे उलटून गेली आहेत. त्यानंतर स्थानिक लष्करी कमांडर पातळीवर चर्चेच्या डझनावारी फेऱ्या आणि मुत्सद्दी पातळीवरील दोन डझनावारी फेऱ्या पार पडल्या आहेत. निर्लष्करी टापूमध्ये घुसखोरी करून त्या भूभागावर चीनने दावा सांगितल्यामुळे समस्या निर्माण झाली. या टापूंमध्ये वर्षानुवर्षे गस्तीबिंदू निश्चित करण्यात आले होते. दोन्ही बाजूंच्या सशस्त्र गस्तीपथकांनी या बिंदूंचे पावित्र्य राखणे अपेक्षित होते. हे टापू निर्लष्करी होते, कारण त्यांवर दोन्ही देशांकडून स्वामित्व सांगितले जाते. अशा परिस्थितीत वादग्रस्त भूभागांना निर्लष्करी निर्धारित करून तेथे गस्तीबिंदू उभारणे हा आंतरराष्ट्रीय संकेत आहे.फेरआरेखन करण्याच्या नादात लष्करी तुकड्या घुसवल्या. त्यांना प्रतिबंध करण्याचा रास्त प्रयत्न भारताने केला आणि गलवान तसेच इतर ठिकाणी चकमकी झडल्या.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# रानडेंना 'अशा' पद्धतीने हटवणे चुकीचे

## राज ठाकरेंनी रानडेंची नियुक्ती रद्द केल्याने व्यक्त केली नाराजी

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पुण्यातील गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या कुलगुरु पदावरुन डॉ. अजित रानडे यांना काढण्यात आल्यानंतर समाजातल्या विविध स्तरांमधून प्रतिक्रिया उमटत आहेत. रघुनाथ माशेलकर, भालचंद्र मुणगेकर यांनी या निर्णयावरुन टीका केली आहे. तसंच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सरकारचे कान टोचले आहेत.**



गेले दोन दिवस वर्तमानपत्रामंध्ये पुण्यातील गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या कुलगुरू पदावरून डॉ. अजित रानडे यांना अतिशय चुकीच्या पद्धतीने हटवल्याची बातमी वाचनात येत आहे. डॉ. अजित रानडेंसारख्या एका उच्चविद्याविभूषित, खासगी क्षेत्रात खूप मोठी कामगिरी केलेल्या व्यक्तीला, अशा पद्धतीने पदावरून हटवणं हे अत्यंत चुकीचं आहे. बरं, त्यासाठी रानडे यांना १० वर्षांचा अध्यापनाचा अनुभव नाही हे कारण पुढे केलं जात आहे. मग त्यांची नियुक्ती करताना, ही बाब लक्षात आली नव्हती का? अडीच वर्ष या पदावर राहून त्यांनी जी कामगिरी केली, त्यानंतर अचानक ही आठवण कशी होते ? अमेरिकेत किंवा पाश्चात्य देशांत, त्या त्या क्षेत्रातील अनुभवी माणसं पुढे अध्यापन क्षेत्रात येतात आणि शिक्षकाला त्या व्यवस्थांमध्ये प्रचंड मानसन्मान असतो. असं राज ठाकरे म्हणाले.यानंतर पोस्टमध्ये राज ठाकरे म्हणाले मी आत्ता अमेरिकेला गेलो असताना, तिथल्या अनेकांशी बोलताना, मला जाणवलं की अगदी नोबेल पुरस्कार विजेते, ते एखाद्या अवाढव्य उद्योग समूहात दीर्घकाळ उच्च पदावर काम केलेला माणूस पुढे विद्यापीठांमध्ये शिकवतो. एखाद्या विद्यापीठाचा प्रमुख होतो. तिथे त्या व्यक्तीची बुद्धिमत्ता, अनुभव, आणि त्या व्यक्तीची कार्यक्षमता हेच निकष बघितले जातात. 'अध्यापन अनुभव' असले काहीतरी फुटकळ निकष लावले जात नाहीत. मुळात आपल्याकडचं शिक्षण हे व्यवसाय उद्योगांना पूरक नसतं. याला दोन कारणं मला नेहमी जाणवतात की अभ्यासक्रम तयार करणारे, हे त्या क्षेत्रांत काम केलेले असतातच असं नाही, आणि शिकवणारे पण त्या क्षेत्रातील अनुभवी नसतात. त्यामुळे मुलांना जे शिकवलं जातं, ते पुढे त्यांना बाहेर पडल्यावर उपयोगी पडत नाही आणि त्यांची मग ओढाताण सुरु होते, बेरोजगारांच्या फौजा तयार होतात.या पुढे राज ठाकरेम्हणतात, हे सगळं असताना डॉ. अजित रानडेंसारखी व्यक्ती स्वेच्छेने शिक्षण क्षेत्रांत उतरते, आणि अशा व्यक्तीला पूर्णपणे नाउमेद करणारी कृती सरकारकडून घडणार असेल, तर या क्षेत्रांत पुन्हा कुठला तज्ज्ञ आणि धडपड्या माणूस येईल? आणि अशा पद्धतीने माणसांना अपमानित करून बाहेर काढणे हेच 'नवं शैक्षणिक धोरण' आहे का ?' जरी हा विषय थेट राज्य सरकारच्या अखत्यारीत येत नसला तरी केंद्रातील सरकारकडे, राज्य सरकारने बोललं पाहिजे आणि यूजीसीने केलेली चूक सुधारलीच पाहिजे... शिक्षण क्षेत्रांत फार मूलभूत काम करणं जर शक्य नसेल तर किमान अशा गोष्टींतून चुकीचे पायंडे पडतील आणि समाजातील बुद्धिमान लोकं नाऊमेद होणार नाहीत इतकं तरी सरकारने पहावं...गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अजित रानडे यांची नियुक्ती रद्द केल्याचा निर्णय अत्यंत धक्कादायक, निराशाजनक, कालविसंगत आणि शिक्षण क्षेत्राला मागे घेऊन जाणारा असल्याचं स्पष्ट मत आर्थिक विषयातील, तसेच शिक्षण आणि संशोधन क्षेत्रातील दिग्गजांनी 'लोकसत्ता'कडे व्यक्त केलं आहे. विविध प्रतिक्रिया उमटत असतानाच आता राज ठाकरेंनी सरकारला खडे बोल सुनावले आहेत. पुण्यातील गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या कुलगुरु पदावरून डॉ. अजित रानडे यांना काढण्यात आल्यानंतर समाजातल्या विविध स्तरांमधून प्रतिक्रिया उमटत आहेत.

### सरकारला खडे बोल सुनावले

रघुनाथ माशेलकर, भालचंद्र मुणगेकर यांनी या निर्णयावरुन टीका केली आहे. तसंच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सरकारचे कान टोचले आहेत. गेले दोन दिवस वर्तमानपत्रामंध्ये पुण्यातील गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या कुलगुरू पदावरून डॉ. अजित रानडे यांना अतिशय चुकीच्या पद्धतीने हटवल्याची बातमी वाचनात येत आहे. डॉ. अजित रानडेंसारख्या एका उच्चविद्याविभूषित, खासगी क्षेत्रात खूप मोठी कामगिरी केलेल्या व्यक्तीला,बरं, त्यासाठी रानडे यांना १० वर्षांचा अध्यापनाचा अनुभव नाही हे कारण पुढे केलं जात आहे.

# लाडकी बहीण योजनेवरून श्रेयावादाची लढाई सुरु

## निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला मोठा फटका : बच्चू कडू

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे महाविकास आघाडी आणि महायुतीचे नेते कामाला लागले आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक राजकीय नेत्यांनी राज्यभरात दौरा करत मतदारसंघाचा आढावा घेत सभा, मेळाव्याच्या माध्यमातून निवडणुकीची रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. या दौऱ्यांच्या माध्यमातून उमेदवारांची चाचपणी देखील केली जात आहे.**

दरम्यान, लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला मोठा फटका बसला होता.महायुतीला राज्यात फक्त १८ जागा जागा मिळाल्या होत्या. त्यामुळे महायुतीने आता विधानसभेसाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरु केली आहे. मात्र, असे असतानाच प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते आमदार बच्चू कडू यांनी लोकसभा निवडणुकीत नेमकी काय झालं? आणि शिवसेना शिंदे गटाच्या जागांवर उमेदवार देताना भारतीय जनता पक्षाने हस्तक्षेप केल्याचा आरोप बच्चू कडू यांनी केला आहे. "मतदारसंघ शिवसेना शिंदे गटाकडे आणि उमेदवार ठरवतं भाजपा, आणि हाच हस्तक्षेप मारक ठरला",



असा गंभीर आरोप आमदार बच्चू कडू यांनी केला आहे. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे."लोकसभा निवडणुकीत अमरावती मतदारसंघात नवनीत राणा निवडून येणार नाही, हे सर्व्हेमध्ये स्पष्ट होतं. मात्र, असं असतानाही भारतीय जनता पक्षाने विरोध असतानाही नवनीत राणा यांना तिकीट देतं आणि शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवाराला भाजपा म्हणतं की तुमचा सर्व्हे बरोबर नाही, म्हणजे मतदारसंघ शिवसेना शिंदे गटाकडे आणि उमेदवार ठरवतं भाजपा. हा जो काही हस्तक्षेप आहे, हाच हस्तक्षेप खरं तर मारक ठरलेला आहे", असा आरोप आमदार बच्चू कडू यांनी केला आहे.प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते, आमदार बच्चू कडू यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटावर बोलताना मोठा दावा केला आहे.

### बच्चू कडू काय म्हणाले?

आगामी काळात अजित पवार गटाचे अर्ध्याहून आधिक आमदार हे शरद पवार गटात जातील. काही दिवसांनी अजित पवार देखील तिकडे दिसू शकतात. त्यांना कुणीही अडवलेलं नाही. शेवटी हे राजकारण आहे. कधी कुणाच्या पारड्यात जाऊन बसायचं किंवा कुणाबरोबर राहायचं, हा ज्याचा त्याचा निर्णय आहे", असं मोठं विधान बच्चू कडू यांनी केलं.राज्यात महायुती सरकारमध्ये लाडकी बहीण योजनेवरून श्रेयावादाची लढाई सुरु असल्याचं बोललं जातं. यावर बोलताना बच्चू कडू म्हणाले, "राज्यात तीन पक्षाचे सरकार आहे. त्यामुळे श्रेयवादाची लढाई होणारच.

# श्रीनगरच्या चौकात बिनधोक फिरा!

## अमित शाह यांनी सुशील कुमार शिंदे यांना टोला लगावला

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी सोमवारी काँग्रेस नेते सुशील कुमार शिंदे यांना टोला लगावला आहे. सुशील कुमार शिंदे यांनी श्रीनगरच्या लाल चौकात खुशाल, बिनधोक फिरावं त्यांना काही धोका नाही असं अमित शाह यांनी म्हटलं आहे. त्यांचं हे वक्तव्य चर्चेत आलं आहे. आज काश्मीर येथील रॅलीला संबोधित करताना अमित शाह यांनी सुशील कुमार शिंदेंवर टीका केली आहे.**



### दहा वर्षांनी होते आहे निवडणूक

आता अमित शाह यांनी बिनधोकपणे लाल चौकात फिरा असं म्हणत सुशील कुमार शिंदेंना टोला लगावला आहे.दहा वर्षांनी जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. नेत्यांकडून प्रचाराची रणधुमाळी सुरु झाली आहे. अमित शाह यांनी आपल्या सभेत काँग्रेसवर जोरदार टीका केली. काँग्रेस हे आपल्या कुटुंबाचं सरकार स्थापण्याचा प्रयत्न केला असा आरोप त्यांनी केला तसंच राहुल गांधींवरही जोरदार टीका केली."काँग्रेस नेते राहुल गांधी यांना देश पुन्हा एकदा दहशतवादाकडे ढकलायचा आहे. जम्मू काश्मीरमध्ये जर काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सचं सरकार आलं तर ते या राज्याला पुन्हा दहशतवादात ढकलतील. मात्र मी तुम्हाला वचन देतो की आम्ही दशतवाद गाडण्याचा संकल्प केला आहे.

"सुशील कुमार शिंदे, काँग्रेसच्या कार्यकाळात देशाचे गृहमंत्री होते. ते गृहमंत्री असताना श्रीनगरच्या लाल चौकात गेले होते, मात्र तिथे फिरायची भीती वाटत होती असं त्यांनी नुकतंच मान्य केलं. मी आज त्यांना सांगू इच्छितो, शिंदेसाहेब तुम्ही लाल चौकात बिनधोकपणे फिरा, तुमच्या मुलांनाही घेऊन या. तुम्हाला काही करायची कुणाचीही हिंमत होणार नाही." जम्मू काश्मीरच्या रामबन या ठिकाणी आयोजित करणाऱ्या आलेल्या रॅलीमध्ये अमित शाह यांनी हे वक्तव्य केलं आहे. सुशील कुमार शिंदेंनी १० सप्टेंबरच्या कार्यक्रमात हे वक्तव्य केलं होतं. त्यावरुन अमित शाह यांनी टीका केली आहे."मी गृहमंत्री होण्याआधी शिक्षण तज्ज्ञ विजय धर यांची भेट घेतली होती. मी त्यांचा सल्ला अनेकदा घ्यायचो. त्यांनी मला सांगितलं होतं ती की तुम्ही श्रीनगरच्या लाल चौकात जा, तिथे लोकांना भेटा. दाल लेक जो आहे तिथे जा, तिथल्या लोकांशी चर्चा करा. त्यांनी हा सल्ला दिल्याने मला प्रसिद्धी मिळाली. लोकांना वाटलं होतं की गृहमंत्री इथे फिरत आहेत. मात्र मी आतून घाबरलो होतो हे कुणाला सांगणार? " असं शिंदे म्हणाले होते. त्यांच्या या वक्तव्याची चांगलीच चर्चाही झाली होती. आता अमित शाह यांनी बिनधोकपणे लाल चौकात फिरा असं म्हणत सुशील कुमार शिंदेंना टोला लगावला आहे.दहा वर्षांनी जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. नेत्यांकडून प्रचाराची रणधुमाळी सुरु झाली आहे. अमित शाह यांनी आपल्या सभेत काँग्रेसवर जोरदार टीका केली. काँग्रेस हे आपल्या कुटुंबाचं सरकार स्थापण्याचा प्रयत्न केला असा आरोप त्यांनी केला तसंच राहुल गांधींवरही जोरदार टीका केली."काँग्रेस नेते राहुल गांधी यांना देश पुन्हा एकदा दहशतवादाकडे ढकलायचा आहे. जम्मू काश्मीरमध्ये जर काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सचं सरकार आलं तर ते या राज्याला पुन्हा दहशतवादात ढकलतील. मात्र मी तुम्हाला वचन देतो की आम्ही दशतवाद गाडण्याचा संकल्प केला आहे. त्यामुळे यावेळी आम्हीच जिंकणार." असा विश्वास अमित शाह यांनी व्यक्त केलासुशील कुमार शिंदे यांनी श्रीनगरच्या लाल चौकात खुशाल, बिनधोक फिरावं त्यांना काही धोका नाही असं अमित शाह यांनी म्हटलं आहे. त्यांचं हे वक्तव्य चर्चेत आलं आहे. आज काश्मीर येथील रॅलीला संबोधित करताना अमित शाह यांनी सुशील कुमार शिंदेंवर टीका केली आहे.मी आज त्यांना सांगू इच्छितो, शिंदेसाहेब तुम्ही लाल चौकात बिनधोकपणे फिरा, तुमच्या मुलांनाही घेऊन या. तुम्हाला काही करायची कुणाचीही हिंमत होणार नाही." जम्मू काश्मीरच्या रामबन या ठिकाणी आयोजित करणाऱ्या आलेल्या रॅलीमध्ये अमित शाह यांनी हे वक्तव्य केलं आहे. सुशील कुमार शिंदेंनी १० सप्टेंबरच्या कार्यक्रमात हे वक्तव्य केलं होतं. त्यावरुन अमित शाह यांनी टीका केली आहे.

"मी गृहमंत्री होण्याआधी शिक्षण तज्ज्ञ विजय धर यांची भेट घेतली होती. मी त्यांचा सल्ला अनेकदा घ्यायचो. त्यांनी मला सांगितलं होतं ती की तुम्ही श्रीनगरच्या लाल चौकात जा, तिथे लोकांना भेटा. दाल लेक जो आहे तिथे जा, तिथल्या लोकांशी चर्चा करा. त्यांनी हा सल्ला दिल्याने मला प्रसिद्धी मिळाली. लोकांना वाटलं होतं की गृहमंत्री इथे फिरत आहेत. मात्र मी आतून घाबरलो होतो हे कुणाला सांगणार? " असं शिंदे म्हणाले होते. त्यांच्या या वक्तव्याची चांगलीच चर्चाही झाली होती.

# दहशतवाद एक दिवसात तयार होत नाही

## आधी धर्मांधिता जन्म घेते; तस्लिमा नसरीन यांचं वक्तव्य

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बांगलादेशच्या सुप्रसिद्ध लेखिका तस्लिमा नसरीन यांनी बांगलादेशमधली स्थिती, दहशतवाद, स्त्रियांची अवस्था यावर भाष्य केलं आहे. दहशतवाद हा एका दिवसात जन्माला येत नाही आधी धर्मांधता जन्माला येते असंही त्यांनी म्हटलं आहे.**



### माझे वडील धर्म मानत नव्हते

तस्लिमा नसरीन ( TASLIMA NASREEN ) यांना त्यांच्या बालपणाविषयी विचारलं असता त्या म्हणाल्या, "मी लहान होते तेव्हापासून मला आठवतं आहे. माझे वडील धर्म वगैरे मानत नव्हते. ते ईद साजरी करायचे. पण नमाज पठण करत नव्हते. आई सांगायची कुराण वाच, नमाज पठण कर. मी आईला विचारायचे की मी ते का वाचू? ते फारसी भाषेत आहे. मी जेव्हा १४ ते १५ वर्षांची होते तेव्हा मला बांगला भाषेतील कुराण मिळालं. मी जेव्हा ते वाचलं तेव्हा महिलांबाबत त्यात म्हटलंय ते मला कळलं. असंही तस्लिमा नसरीन म्हणाल्या

शेख हसीना यांनी ज्या प्रकारे बांगलादेश सोडला तसं त्या करतील असं मला वाटलं नव्हतं. तसंच त्या पंतप्रधान पद सोडतील असंही वाटलं नव्हतं. त्यांच्या निवासस्थानी विद्यार्थ्यांनी आंदोलन केलं. त्यावेळी शेख हसीना तिथे असत्या तर त्यांची हत्या झाली असती. आम्ही विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा दिला होता. मात्र आम्हाला हे ठाऊक नव्हतं की विद्यार्थ्यांचा प्यादं म्हणून वापर करणारे लोक वेगळे आहेत. जर शेख हसीना यांच्यावर राग होता तर मग मुजीबुर्रहमान यांचे पुतळे का तोडले? आग का लावली? या सगळ्यामागे एक विशिष्ट विचारसरणीने काम करणारा इस्लामी ग्रुप होता असं तस्लिमा नसरीन म्हणाल्या. तस्लिमा नसरीनयांनी आज तकला मुलाखत दिली आहे त्यामध्ये त्यांनी हे वक्तव्य केलं.

# गणपतीबाप्पा मोरया पुढच्या वर्षा लवकर या..!

भाद्रपद शुध्द चतुर्दशीला अनंत चतुर्दशी म्हणत असतात. या दिवशी अनंत म्हणजे विष्णुची पूजा करतात व अनंताचे व्रत करतात. आपल्यावर आलेले संकट दूर व्हावे व आपल्याला पुन्हा वैभव प्राप्त व्हावे म्हणून सतत चौदा वर्षे चौदा गाठी असलेले रेशमी दोरा अनंत मानून त्याची पूजा करून हे व्रत पूर्ण करतात. आपल्या सणावारांचा प्रारंभ प्रतिवर्षी नागपंचमीपासून होतो आणि त्यातील एक पर्व अनंत चतुर्दशीला संपते. अनंत हे एका महानागाचे नाव असले आणि हे नाव जपणे पुण्यकारक मानले जात असले तरी अनंत हे विष्णुचे नाव आहे, हे नजरेआड करता नये. अनंत चतुर्दशीच्या दिवशी विष्णुची 'अनंत' ह्या नावाने पूजा केली जाते. अनंत चतुर्दशीचे व्रत खूप घरातून पाळले जाते. १४ प्रकारची फुले, १४ प्रकारची फळे, १४ प्रकारची धान्ये आणि १४ प्रकारचे नैवेद्य दाखवून एका दोरकासह अनंताची पूजा केली जाते. हा दोरक म्हणजे दोरा अनंत म्हणूनच ओळखला जातो.

हा उजव्या हाताच्या मनगटावर बांधतात आणि तो सर्वप्रकारच्या संकटापासून रक्षण करतो, अशी श्रद्धा असते. ह्या व्रताचा विशेष असा की, ही पूजा झाल्यानंतर विसर्जन मागाहून दुस-या दिवशी किंवा गणपती पूजेप्रमाणे दोन, पाच दिवसांनी अशाप्रकारे न करता त्याच दिवशी पूजेनंतर काही वेळाने करण्याची रुढी आहे. हे अनंताचे व्रत १४ वर्षे आचरावे असे सांगितलेले असले तरी अनेक लोक ते आजन्म पाळत असतात. ह्या व्रताची कथा सत्यनारायणाच्याकथेसारखीच आहे. म्हणजे कोणी अडचणीत सापडला असता त्याला दुस-या कोणी तरी अनंताचे व्रत करण्यास सांगितले आणि त्यामुळे त्याचे दुःख निवारण झाले. पुढे तो हे व्रताचरण विसरला आणि त्याच्यावर घोर आपत्ती आल्या, अशा स्वरुपाच्या या व्रताच्या कथा आहेत. नेहमीप्रमाणे ह्या कथेचाही नायक एक ब्राह्मण आहे. त्याच्या




पत्नीने एका कन्येला जन्म दिला, तिचे नाव शीला! तिच्या जन्मानंतर ब्राह्मणाची पत्नी दिवंगत झाली. सुमंतुने म्हणजे त्या ब्राह्मणाने दुसरा विवाह केला. ती पत्नी अतिशय कर्कशा होती. पुढे ह्या शीलेचा विवाह कौंडिण्य ऋषीशी झाला. 'निरोप देताना जावयाला काहीतरी देऊ या,' असे सुमंतुने म्हटल्यावर त्याची कर्कशा पत्नी आडवी आली. तिने सुमंतुला ते देऊ दिले नाही. उलट जावयाला आणि लेकीलाही दुरुत्तरे केली. ती पतीबरोबर सासरी जात असताना वाटेत एकेठिकाणी काही स्त्रिया अनंताचे व्रत आचरित असताना तिला दिसल्या. त्या स्त्रियांकडे शीलेने व्रताची चौकशी केली आणि ती त्या दिवसापासून ते व्रत आचरु लागली. व्रताच्या प्रभावाने तिला म्हणजे कौंडिण्याला वैभवाचे दिवस आले. तो खूप श्रीमंत झाला आणि त्याला श्रीमंतीची धुंदी चढली.

एके दिवशी त्याने शीलेच्या हातातील अनंताचा दोर तोडून टाकला आणि त्यामुळे अनंत त्याच्यावर रागावला. कौंडिण्याचे सर्व वैभव गेले. त्याला पश्चाताप झाला आणि मग त्याच्या सहनशीलतेचा अंत पाहून अनंताने ब्राह्मणरुपात त्याला दर्शन दिले आणि पुन्हा व्रताचरण करण्यास सांगितले. त्यामुळे कौंडिण्याला पुन्हा वैभव प्राप्त झाले. ही कथा साधारणपणे आपल्या सत्यनारायणाच्याकथेशी मिळतीजुळती असली तरी सत्यनारायणाच्यापूजेपेक्षा हे व्रत खूपच प्राचीन आहे यात शंका नाही. सत्यनारायणाची पूजा ही आपल्याकडे अलीकडे आली. अनंत चतुर्दशीचे महत्त्व अधिक वाढविणारा योग म्हणजे गणेशोत्सवातील मूर्तींचे विसर्जन सगळीकडे थाटामाटात केले जाईल. जलाशयात मूर्ती विसर्जित करावयाच्या असा धर्मनियम असल्यामुळे समुद्र, नद्या, विहिरी अशा ठिकाणी गणेशभक्त वाजतगाजत जाऊन मूर्तींचे विसर्जन करतात. सगळीकडे आनंदाचा जल्लोष चालू असतो आणि अशा जल्लोषामुळे अनंत चतुर्दशी हा अनंताच्या व्रताचा दिवस आहे, ही गोष्ट फारशी कोणाच्या ध्यानातच येत नाही. गणपतीबाप्पा मोरया पुढच्या वर्षा लवकर या....!

## गणेश विसर्जन का करावे :-

गणेशजींनी सलग १० दिवस महाभारत लिहिले होते. एका जागी बसल्यामुळे त्यांचे शरीर उष्णतेने जळू लागले होते. हे ज्यावेळी व्यास ऋषींनी पाहिले त्यानंतर वेद व्यासजींनी त्यांना एका जलस्त्रोतावर नेले आणि तेथे पाण्यात स्नान केले. त्यामुळे गणेशजींना मोठा आराम मिळाला. त्या दिवशी अनंत चतुर्दशी होती. त्या दिवसापासून या तिथीला गणेशजींचे विसर्जन करण्याची प्रथा आहे. ज्ञान, बुद्धीची देवता, आणि पाणी, हे देखील ज्ञान आणि शहाणपणाशी संबंधित असल्याचे मानले जाते, याचे कारण स्वतः गणपती बाप्पा आहेत. गणपती बाप्पाची मूर्ती पाण्यात विसर्जित केल्याने, भगवान गणेश शरीरापासून निराकारात विरघळतात. पाणी हे पाच तत्वांपैकी एक मानले गेले असल्यामुळे, ज्यामध्ये प्राणप्रतिष्ठेने स्थापन केलेली गणेशाची मूर्ती मूळ स्वरूपात पाच तत्वांमध्ये विरघळते आणि विलीन होते. असे मानले जाते की, श्री गणेशाने महाभारत लिहिले होते. महर्षी वेद व्यास यांनी सलग १० दिवस गणेशाला महाभारताची कथा सांगितली आणि गणेशाने ही कथा अगदी १० दिवसात लिहून काढली. १० दिवसांनंतर वेद व्यासजींनी गणेशजींना स्पर्श केला, त्यावेळी त्यांच्या शरीराचे तापमान खूप वाढले असल्याचे त्यांना दिसले. वेदव्यासजींनी त्यांना ताबडतोब जलकुंभावर नेले आणि तेथे पाण्यात स्नान केले आणि शरीराचे तापमान शांत केले. त्यावेळी श्री गणेशजींना आराम मिळाला. तेव्हापासून असे मानले जाते की, गणेशाचे विसर्जन त्यांना थंड करण्यासाठी आराम मिळण्यासाठी केले जाते. जीवन हे मृत्यूचे एक चक्र आहे. विसर्जनाचा नियम असे सांगतो की, जग एका चक्राच्या रूपाने फिरत असते, हे माणसाला समजले पाहिजे. या पृथ्वीतलावर जी काही जीवसृष्टी आलेली आहे, ती जीवसृष्टी परत आपल्या जागी जाते. आणि मग जेव्हा वेळ येते त्यावेळी ती पृथ्वीवर परत येते. असे कालचक्र सुरू असते. आपण मोठ्या प्रेमाने बाप्पाची मुर्ती घरी आणतो, नंतर आपण त्याच्या मूर्ती स्वरुपाने मंत्रमुग्ध होतो, पण त्याला जायचे आहे, म्हणजेच गणपती विसर्जन म्हणून त्याचा मोह सोडावा लागतो.



## गणेश विसर्जनाची पद्धत :-

विसर्जनाच्या दिवशी सकाळी नियमितपणे बाप्पाची पूजा करावी. दुपारी आरती ,नैवेद्य दाखवून त्यानंतर संध्याकाळी पुनः पूजा करून शुभ मुहूर्तावर गणरायाला निरोप द्यावा. विसर्जनास न्यायच्यावेळी मूर्ती एखाद्या लाकडी पाटावर ठेवावी. पाटावर ठेवताना आधी रंगोली काढावी. त्यावर पिवळे किंवा लाल रंगाचे कापड पसरून त्यावर स्वस्तिक काढावे. त्यानंतर गणपती बाप्पाला ढोल-ताशांच्या गजरात आनंदाने नदीच्या काठावर,समुद्रावर किंवा तलावाच्या काठावर घेऊन जा. तेथे बाप्पाची पुन्हा आरती करा आणि आपल्या मनोकामना पूर्ण होण्यासाठी त्यांच्याकडून आशीर्वाद घ्यावा. आणि बाप्पाला सांगावे, की या वर्षी येऊन तुम्ही ज्या प्रकारे आमच्या आयुष्यात आनंद दिलात, तशाच प्रकारे पुढच्या वर्षीही आमच्या घरी या आणि आमच्याकडून आपली सेवा घडवून आणा. पूजा अर्चा करताना झालेल्या चुकांबद्दल माफी मागावी. नंतर गणपती बाप्पा मोरया च्या जयघोषात मूर्ती पाण्यात विसर्जित करावी. भगवान गणेशाच्या जन्मचक्राला सूचित करण्यासाठी हा विधी केला जातो. तो मातीपासून/पृथ्वीपासून निर्माण झालेला त्याचा प्रतीकात्मक पुतळाही आहे. त्यामुळे मूर्ती पाण्यात विसर्जित केली जाते. जेणेकरून गणेश भक्तांच्या घरी किंवा मंदिरात ज्या ठिकाणी गणेश चतुर्थीचा विधी आयोजित केला जातो त्या ठिकाणी 'मुक्काम' केल्यानंतर गणेश आपल्या घरी परत जाईल. हिंदू धर्मात गणेशाला बुद्धीची, ज्ञानाची देवता मानतात. सर्व शुभ कार्यात प्रथम गणपतीची पूजा करतात. कारण तो सुखकर्ता, दुखहर्ता, विघ्नहर्ता आहे. म्हणूनच संकटनाशक देव म्हणून ओळखला जाणारा गणेश, अडथळे दूर करणारा म्हणूनही पूजला जातो . गणेशमूर्ती विसर्जनासाठी बाहेर काढल्यावर घरातील विविध अडथळेही दूर होतात आणि विसर्जनासोबतच हे विघ्नही नष्ट होतात, असा समज आहे. म्हणून गणपती विसर्जन करणे चांगले समजले जाते. सलग १० दिवस महाभारताचे लिखाण करताना श्री गणेशाच्या शरीराचे तापमान खूप वाढले होते.

# कोहलीचा विषय लय भारी!

## विराट कोहलीच्या एका शॉटने भिंतीला पाडलं भगदाड

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारतीय संघ सध्या बांगलादेशविरूद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यासाठी चेन्नईमध्ये दाखल झाला आहे. पहिला कसोटी सामना ९ सप्टेंबरपासून बांगलादेशविरुद्ध खेळवला जाणार आहे. चेन्नई येथे होणाऱ्या या सामन्यासाठी संपूर्ण भारतीय संघ जोमाने सराव करत आहे. या सरावादरम्यान विराट कोहलीने चेपॉक मैदानाची भिंत फोडली. चेपॉक स्टेडियमवर रविवारी झालेल्या सराव सत्रात विराटने असा फटका मारला की भिंतीला भगदाड पडले आहे.**





विराट कोहली १५ तारखेला नेटमध्ये सराव करत होता. सराव करताना विराट काही कव्हर ड्राईव्ह मोठे फटके खेळताना दिसला. विराट गोलंदाजांसमोर आक्रमक क्रिकेट खेळत होता. यादरम्यान तो जबरदस्त फटकेबाजी करताना षटकार आणि चौकार एकामागून एक लगावत होता. या व्हिडीओमध्ये विराटने शानदार शॉट खेळला, ज्यामुळे ड्रेसिंग रूमजवळील भिंतीला छिद्र पडले. हा व्हिडिओ एका चाहत्याने शेअर केला आहे. विराट कोहलीने ड्रेसिंग रूमची भिंत तोडल्याचा हा व्हीडीओ चांगलाच व्हायरल झाला आहे.विराट कोहलीचे काही फोटोही सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. या फोटोंमध्ये विराट त्याच्या चाहत्यांना ऑटोग्राफ देताना दिसत आहे. विराट बऱ्याच कालावधीनंतर या मालिकेतून कसोटीत पुनरागमन करणार आहे. त्याने जानेवारी २०२४ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कसोटी मालिका खेळली होती. आता तो बांगलादेशविरुद्धच्या सामन्यातून कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन करणार आहे. या मालिकेत विराटला अनेक मोठे विक्रम करण्याची संधी असेल. दुसरीकडे, बांगलादेशच्या खेळाडूंमध्ये मोठा उत्साह आहे. पाकिस्तानविरूद्धच्या कसोटी मालिकेत बांगलादेशने प्रथमच कसोटी मालिका जिंकली, ज्याचा आनंद त्यांच्या अंतरिम सरकारने ३.२० कोटी बांगलादेशी टका रोख बक्षीसही जाहीर केली. बांगलादेशने आतापर्यंत भारतात एकही कसोटी मालिका जिंकलेली नाही आणि आपला चांगला फॉर्म कायम ठेवण्याची इच्छा आहे.बांगलादेशने आतापर्यंत भारतात एकही कसोटी मालिका जिंकलेली नाही. बांगलादेशच्या संघात असे अनेक खेळाडू आहेत जे भारतासाठी अडचणी निर्माण करू शकतात. भारताने २०२४ च्या सुरुवातीला शेवटची कसोटी मालिका खेळली, ज्यामध्ये रोहित शर्माच्या संघाने घरच्या मैदानावर इंग्लंडचा ४-१ ने पराभव केला.चेन्नई येथे होणाऱ्या या सामन्यासाठी संपूर्ण भारतीय संघ जोमाने सराव करत आहे. या सरावादरम्यान विराट कोहलीने चेपॉक मैदानाची भिंत फोडली. चेपॉक स्टेडियमवर रविवारी झालेल्या सराव सत्रात विराटने असा फटका मारला की भिंतीला भगदाड पडले आहे.यादरम्यान तो जबरदस्त फटकेबाजी करताना षटकार आणि चौकार एकामागून एक लगावत होता. या व्हिडीओमध्ये विराटने शानदार शॉट खेळला, ज्यामुळे ड्रेसिंग रूमजवळील भिंतीला छिद्र पडले. हा व्हिडिओ एका चाहत्याने शेअर केला आहे. विराट कोहलीने ड्रेसिंग रूमची भिंत तोडल्याचा हा व्हीडीओ चांगलाच व्हायरल झाला आहे.विराट कोहलीचे काही फोटोही सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. विराट बऱ्याच कालावधीनंतर या मालिकेतून कसोटीत पुनरागमन करणार आहे. त्याने जानेवारी २०२४ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कसोटी मालिका खेळली होती. आता तो बांगलादेशविरुद्धच्या सामन्यातून कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन करणार आहे. या मालिकेत विराटला अनेक मोठे विक्रम करण्याची संधी असेल. दुसरीकडे, बांगलादेशच्या खेळाडूंमध्ये मोठा उत्साह आहे. पाकिस्तानविरूद्धच्या कसोटी मालिकेत बांगलादेशने प्रथमच कसोटी मालिका जिंकली, ज्याचा आनंद त्यांच्या अंतरिम सरकारने ३.२० कोटी बांगलादेशी टका रोख बक्षीसही जाहीर केली. बांगलादेशने आतापर्यंत भारतात एकही कसोटी मालिका जिंकलेली नाही आणि आपला चांगला फॉर्म कायम ठेवण्याची इच्छा आहे.

### विराटने शानदार शॉट खेळला

बांगलादेशने आतापर्यंत भारतात एकही कसोटी मालिका जिंकलेली नाही. बांगलादेशच्या संघात असे अनेक खेळाडू आहेत जे भारतासाठी अडचणी निर्माण करू शकतात. भारताने २०२४ च्या सुरुवातीला शेवटची कसोटी मालिका खेळली, ज्यामध्ये रोहित शर्माच्या संघाने घरच्या मैदानावर इंग्लंडचा ४-१ ने पराभव केला.विराट कोहली १५ तारखेला नेटमध्ये सराव करत होता. सराव करताना विराट काही कव्हर ड्राईव्ह मोठे फटके खेळताना दिसला. विराट गोलंदाजांसमोर आक्रमक क्रिकेट खेळत होता. यादरम्यान तो जबरदस्त फटकेबाजी करताना षटकार आणि चौकार एकामागून एक लगावत होता.

# सचिन तेंडुलकरच्या लेकाने मैदान गाजवलं

## 9 विकेट्स घेत अर्जुनने संघाला मिळवून दिला विजय

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा लेक वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत क्रिकेटच्या मैदानावर आपलं नशीब आजमवत आहे. अर्जुन हा एक वेगवान गोलंदाज असून त्याच्या गोलंदाजीमुळे तो पुन्हा एकदा चर्चेत आला. डावखुरा वेगवान गोलंदाज सध्या कर्नाटकात सुरू असलेल्या डॉक्टर के थिमप्पिया मेमोरियल स्पर्धेत खेळत आहे.**






जिथे त्याने गोव्याकडून खेळताना कर्नाटक संघाविरुद्ध भेदक गोलंदाजी केली. या रेड बॉल स्पर्धेत अर्जुनने शानदार गोलंदाजी करत गोव्याला एक डाव आणि १८९ धावांनी विजय मिळवून देण्यात मोठी भूमिका बजावली. अर्जुन तेंडुलकरने गोवा क्रिकेट असोसिएशनकडून खेळताना सामन्यात एकूण ९ विकेट घेतल्या. पहिल्या डावात त्याने पाच तर दुसऱ्या डावात अर्जुनने चार विकेट घेतले. आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून पदार्पण करणाऱ्या अर्जुनच्या भेदक गोलंदाजीसमोर प्रतिस्पर्धी संघाचे खेळाडू फेल ठरले. अर्जुन तेंडुलकरने केएससीए इलेव्हनच्या फलंदाजांना फार काळ मैदानात टिकू दिले नाही. या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाने पहिल्या डावात केवळ ४१ धावा देत ५ विकेट्स घेतले. अर्जुन तेंडुलकरने केएससीए इलेव्हनच्या पहिल्या पाचपैकी चार फलंदाजांना बाद केले आणि त्यानंतर अक्षन रावची विकेट घेत पाच विकेटचा टप्पा पूर्ण केला. केएससीए इलेव्हन संघाला पहिल्या डावात केवळ १०३ धावा करता आल्या. प्रत्युत्तरात गोवा क्रिकेट असोसिएशन संघाने पहिल्या डावात ४१३ धावांची मोठी मजल मारली.

### 55 धावांत 4 विकेट घेतले

अभिनव तेजरानाने १०९ धावांची खेळी केली. मंथन खुटकरने ६९ धावांची खेळी केली तर अर्जुन तेंडुलकरने १८ धावांचे योगदान दिले.दुसऱ्या डावात अर्जुन तेंडुलकरने पुन्हा आपल्या भेदक गोलंदाजीने प्रतिस्पर्धी खेळाडूने गुढघे टेकायला भाग पाडले. यावेळी केएससीए इलेव्हन संघ अवघ्या १२१ धावांत गारद झाला आणि यावेळीही अर्जुनने मोलाची भूमिका बजावली.. अर्जुनने दुसऱ्या डावात ५५ धावांत ४ विकेट घेतले.